*कथा क्रमांक ८*

# एक दिवस अचानक ...

संध्याकाळची वेळ - पावसाची रिपरिप संपून आता चांगलाच कोसळू लागला होता - हातातल्या पिशव्या सांभाळत तिने चावीने घराचं दार उघडलं आणि नेहमीप्रमाणे हातातील पिशव्या खाली ठेऊन तिने एक दीर्घ निःश्वास टाकला. पदराच्या टोकाने कपाळावरचा घाम पुसत तिने समोर दिसणाऱ्या पॅसेजकडे पाहिले. पॅसेजच्या सुरुवातीला एक मोठी चौकट होती. त्या चौकटीमध्ये चार खिडक्या, बंद दारांच्या दिसत होत्या. प्रत्येक खिडकीचे दार वेगळ्या रंगाचे होते. प्रत्येक दारावर एक घुंगुरांचा छल्ला टांगला होता. तिने विचार केला आणि आपला हात उजव्या बाजूच्या वरच्या दाराकडे नेला.

घुंगरू वाजवणार इतक्यात तिला आठवले की आज मेधाचा वाढदिवस. आज तिला मेधाच्या घरी जायला हवे. मेधा तिच्या बाबांबरोबर तिची वाट पहात असेल. अजित नेहमीप्रमाणे घरात येरझाऱ्या घालत तिची वाट पहात असेल. पण मग ती मेधाकडे गेली तर माधवचे काय? तो तर तापाने फणफणला आहे. त्याला बरे नसले की आई आणि बाबा दोघेही लागतात. नीरजची नुसती चिडचिड चालली असेल. राघवच्या घरी तर नुसता हलकल्लोळ माजला असेल. ती नसेल तर त्याला एक गोष्ट धड सुचत नाही. आरडाओरडा करून घर डोक्यावर घेतो तो. सासूबाई थकून कोचावर बसल्या असतील. समोरच्या भिंतीवर सुहासचा फोटो, बकुळीच्या फुलांच्या हारासहित असेल. त्यांचे दमलेले डोळे तिची वाट पहात असतील. चार घरांच्या चार तऱ्हा. तिची मात्र मधल्यामधे कुचंबणा. जायचे तरी कोठे आणि कसे. कुठल्या दारावर थाप द्यायची? तिला भोवळ आल्यासारखं झालं. काचा घट्ट करीत तिने डोळे मिटले आणि हात पुढे केला. 'ईनी मिनी मायनी मो' तिच्या मनात नकळत आवाज उठला. तिने आपला हात गोलाकार फिरवला आणि समोर पुढे केला.

एक घुंगराचा पट्टा तिच्या हाती आला. तिने तो ओढला आणि वाड्याचे मोठे दार कर्रकर्र आवाज करीत उघडले. तिचे डोळे त्या आवाजाने हलकेच उमलले. पडवीत मुकुंदमामा नेहमीसारखा पान-सुपारीचा तोबरा भरून सकाळ वाचत पसरला होता. आपल्या पांढऱ्या साडीला अंगभर लपेटत हातातील पिशवी पोटाजवळ घेत तिने सोपा-पडवी ओलांडली. मुकुंदने तिच्याकडे पहात हातातला पेपर खाली ठेवला. म्हणाला, 'आत्ता यायला वेळ झाला होय? घरात सासू आणि दीर उपाशी. नवऱ्याला खाल्ले ते खाल्ले! आता गावभर पोळ्या करत हिंड बरे! कुठे फेडशील हे पाप गं? जरा जनाची नाही, मनाची तरी लाज बाळग. " तिच्या छातीत धडधड नुसती रेल्वे-इंजिनसारखी चालू होती. खाली मान घालून तिने माजघरात पाऊल टाकले आणि समोरचं दृश्य पाहून ती हबकूनच गेली. हातातील पिशवी खाली पडली आणि तोंडावर हात घेऊन थिजलेल्या नजरेने ती समोर पहात राहिली. " घरी यायची वेळ टळून आता खूप उशीर झाला. तो मेल्यावर तुला एवढं गावभर उंडारत

फिरायची काय गं जरूर? रंडकेपण काय तुला एकटीलाच आलंय? मी पण पांढरं कपाळ घेऊन दिवस काढलेत की! आता मात्र मी जीवच देणार. " असं म्हणत तिच्या सासूने घासलेटची बाटली अंगावर ओतली. तिने जोरात किंकाळी फोडली आणि पाठमोरी वळून ती जी जोरात पळत सुटली ती तिच्या घराच्या दारासमोर परत येऊनच थांबली. पुन्हा तोच पॅसेज, तीच चौकट, खिडक्या !! छातीतील धडधड थांबवून तिने थिजलेल्या नजरेने समोर पाहिले. कोठे जायचे? डोळे बंद केले, हात पुढे केला आणि एका घुंगरांच्या पट्टयाला हात घातला आणि....

आणि एका घुंगराच्या पट्ट्याला तिने हात घातला आणि तिच्या मनात आले कि कुठे का हा घुंगराचा पत्ता घेऊन जाईना, आधीच्या परिस्थितीपेक्षा नक्कीच बरा असणार. हळूहळू तिने डोळे उघडले आणि एक दार समोर होते. दाराची चौकट अतिशय आकर्षक आणि आधुनिक पद्धीतीची होती. दरवाजा उघडला तो मेधाने. हिच्या मनात आले कि चला दोन क्षण तरी सुखाने जातील. आज मेधाचा वाढदिवस होत.

मेधाच्या उत्साहाला उधाण आले होते. घरात तशी शांतताच होती. तिला आश्चर्यच वाटले. आह आपल्या एकुलत्या एका मुलीचा वाढदिवस आणि अजित त्याचं मुलीला म्हणजे मेधाला सोडून कुठे गेला तसेच तिला वाटले कि मेधा चे मित्र मैत्रिणी असतील पण घरात शांततच होती. मेधा उत्साहात तिला तिचा नवीन ड्रेस दाखवत होती. तिने मेधाला विचारले कि घरत कोणीच कसे नाही. तेव्हा मेधाने सांगितले कि बाबाला अचानक हॉस्पिटल मधून फोन आला आणि तो गेला, हिने मेधाला विचारले कि तुला राग नाही आला का तेव्हा अजाण वयातली पोर पट्कन म्हणली कि तसे महत्वाचे काम असेल म्हणूनच तो गेला. तिने मेधाला विचारले कि तुला वाढदिवसाच्या दिवशी काय पाहिजे. मेधा म्हणली कि मला खीर पाहिजे, आज पाळणाघरात सगळे जेवण तिच्या नावडीचे होते.

तिला भरून आले, इतक्या मोठ्या भरल्या घरात, जिचा वाढदिवस ती मुलगी खीर मागते. ती पटकन उठली आणि स्वयंपाकघरात गेली. कपाटातल्या शेवया काढल्या, आणि खिरीची तयारी सुरु केली. तिच्या मनात आले कि नशीब असते आणि अशा घरात पडली असती तर घराचे सोने केले असते. पण दुनियेचा नियमच आहे. ज्याच्या गुणांची कदर होईल असे घर त्या लोकांना क्वचितच मिळते.

तिकडे हॉस्पिटल मधे अजित ला अत्यंत महत्वाची आणि तातडीची शस्त्रक्रिया करायची होती. त्याला खूप वाईट वाटत होते कि आपल्या मुलीचा वाढदिवस  म्हणून खास सुट्टी घेतली पण अचानक तिला एकटीला घरी सोडू यावे लागले. तेवढ्यात त्याला तिचा मेसेज आला कि ती घरी मेधाजवळ आहे. त्याने एक समाधानाचा सुस्कारा सोडला. तिने ठरवले कि मेधा चा वाढदिवस चं साजरा करायचा, तिने मेधाला विचारून मागच्या वर्षीचे सजावटीचे सामान काढले आणि घर सजवले. मेधा च्या आवडीचचे दोन- तीन पदार्थ केले.

तिलाच तिचे समाधान वाटले. मेधाच्या आई-वडलांचा घटस्फोट झाल्यापासून घराचे घरपणच हरवले होते. तिला समजत नव्हते एवढे दोन उच्चशिक्षित डॉक्टर, एक जण गाण्यात तर दुसरा तबला विशारद पण असे काय झाले असेल नक्की कि त्यांना वेगळे व्हायला लागले. खरे तर तिलाच तिच्या अर्थशून्य संसारातून बाहेर पडायचे होते पण तिची हिम्मत होत नव्हती. पुढच्या जन्मात कोणी पाहलय आत्ता या जन्मी जे आयुष्य मिळालंय ते अक्खे आयुष्य धुसपुसत आणि स्वताच्या नशिबाला दोष देत काढण्यात

काय अर्थ आहे? तिने ठरवले कि आता गप्पा नाही बसायचे... असा विचार करतच तिने दार उघडले आणि ती मेधाच्या घराबाहेर पडली

गोष्ट 8 3

मेधाच्या घरातून बाहेर आली तोच तिच्या मनाला एक आर्त जाणीव झाली ती माधवने मनातच आईला मारलेल्या हाकेची. त्याचा केशरी दरवाजा बंद होता. तिने त्याच्या पट्ट्याला हात लावला आणि घुंगरांचा छन छन असा आवाज आला आणि तो दरवाजा लगेच उघडला.

नीरज माधवकडे चिंतातूर होऊन पाहत होता. माधवचा चेहरा तापाने लाल झालेला होता. तिने त्याच्या कपाळाला हात लावून पहिला. तर हाताला चटका बसला. त्याच्या शरीरातून जणू गरम वाफ बाहेर पडत होती. तिचे थंड अस्तित्व त्या वाफेला शोषून घेऊ लागले. तेथला अवकाश तिच्या शीतल अस्तित्वाने शांत आणि आल्हाददायक होऊ लागला. माधवला तिच्या हाताचा थंडगार स्पर्श हवाहवासा वाटला. नीरजला तिने मानेने खुण केली. तू जा, थोडा आराम कर. त्याला बरे वाटले. चला चिंता मिटली. तिने गार पाण्याचा बाउल त्यात मीठ टाकून आणला व माधवच्या कपाळावर त्या पाण्याच्या घड्या ठेवायला सुरुवात केली. त्याला थोडे स्पंजिंग केले. त्याच्या शरीरावर वारा येऊ दिला. त्याची शरीराची तलखी कमी होऊ लागली. त्याने पाणी मागितले. त्याला थोडे बसते करून तिने त्याला चांगले ग्लासभर पाणी पाजले. तिच्या मायेच्या स्पर्शाने माधवला खूपच बरे वाटू लागले. हळूच डोळे उघडून त्याने पहिले. तिच्या धूसर चेहऱ्यातील ते प्रेमळ डोळे त्याच्या अंतरंगाचा ठाव घेत होते. तिच्या अस्तित्वातच सुरक्षा आणि मायेचे एक जबरदस्त आश्वासन होते. माधवला आश्चर्य वाटले की ज्या ज्या वेळेला माझे मन अस्वस्थ होऊन कोणाला तरी साद घालते तेव्हा तेव्हा ही आपोआप कशी काय हजर होते ? हे विचार जणू कळल्यासारखे ती हसली व त्याला हळुवार थोपटून म्हणाली की आता जाऊ ? मग पुन्हा येईन. काळजी करू नकोस. शांत पडून विश्रांती घे हां. नीरजला गाढ झोप लागली होती.

तिच्या आत्म्याची तगमग होत होती. जीवात जीव होता तोवर देहाची धडपड अटळ होती. ती कोणालाच चुकत नाही. पण त्यानंतर आताही तेच भोग अजूनही का ? तिला समजत नव्हते. या चारही दरवाजांच्या चौकटीत हे असे कोणते अदृश्य जाळे आहे व ते कोणी विणले आहे की मन की आत्मा की हा संस्काररुपी सूक्ष्मकोश त्या जाळ्यातून सुटूच शकत नाही. या चार दरवाजांमधील या अवकाशात ती सारखी का खेचली जात आहे ? आणि त्या प्रत्येक दरवाजामागील प्रत्येक घटनेची साक्षीदारही तिलाच का बनवले जाते आहे ? कोण खेळते आहे हा खेळ तिच्या अस्तित्वाशी ? याला काही अंत नाही का ?

या प्रश्नांनी तिच्याभोवती फेर धरलेला असतानाच त्या चौथ्या निळ्या दरवाजामागील राघवची उलघाल तिच्या अस्तित्वाला अस्वस्थ करू लागली.

निळ्या दरवाज्या मागे राघव ची घालमेल सुरु होती. त्याच्या आई वडलांनी त्याच्या मागे लग्न कर असा धोशा लावला होता. राघवला समजत नव्हते कि कसे सांगावे  त्यांना कि त्याला लग्न करण्यात interest नाही म्हणून. त्याचा लहानपणापासूनचा मित्र संकेतचे लग्न झाल्यापासून आई रोज  मुली बघत होती आणि तो सगळ्या मुलींना नकार देत होता.
तिने निळ्या दरवाज्याची चौकट ओलांडली आणि राघव ला हाक मारली. राघव लगबगीने पुढे झाला आणि म्हणाला कि बरे झाले आलीस मला तुझ्याशी महत्वाचे बोलायचंय.
राघवने गरम कॉफी करून आणली, खरे तर राघव चे घर म्हणजे तिला तिचे हक्काचे माहेर वाटायचे, जणू आपण आपल्या लहान भावाकडे आलोय, राघव आपल्याच विचारात होता. राघव बोलू लागला, हे बघ, तुला माहितच असेल कि माझ्या घरचे माझ्या लग्नासाठी माझ्या किती मागे लागलेत. ती म्हणाली हो, मी सुद्धा तुला सुचवल्या कि कितीतरी मुली. राघव म्हणाला कि जरा ऐक, मला मुलींमध्ये इंटरेस्ट नाहीये. तिच्या डोक्यावरून गेले कि नक्की तो काय म्हणतोय ते.
राघवने स्पष्ट करून सांगितले तेव्हा तिच्या लक्षात आले कि राघव ला कोणत्याच मुलीमध्ये इंटरेस्ट नाहीये आणि त्याला मुलांमध्येच इंटरेस्ट आहे.
आता तिला कळले कि लग्नाची गोष्ट काढल्यावर राघव ची चिडचिड का होत असे. ती राघव ला महान्ली अरे पण तुला लहान बहिणी आहेत दोन , त्यांचा विचार केलायस का तू? आपल्या भारतात अजून हे सगळे मान्य नाहीये. त्यावर राघव तिला म्हणला कि हो, मी सगळा विचार केलाय. मी त्यांची लग्न होईपर्यंत लग्न करायचे नाही असे सांगीतले आणि त्यांना खरे कारण सुद्धा सांगितले तर त्यांनी मला आजपासून तू आमचा मुलगा नाही म्हणून सांगितले आणि मी माझे घरच सोडले. मला आता आईवडीलच नाहीत असे म्हणून राघव ढसाढसा रडायला लागला.
ती विचारातच पडली प्रत्येक बंद दारामाग्ची कैफियत विचारात घेतल्यावर, 'जगी सर्व सुखी असा कोण आहे' या ओळींचा तिला अर्थ पटला.
तिने राघव ला शांत केले आणि म्हणली कि तुला माझी काय मदत हवेय. त्यावर राघवम्हणला  कि मदत अशी काही नकोय फक्त माझ्या बाजूने उभी राहा. त्यावर तिने राघव ला शांत केले आणि अरे माझ्या लहान भावासारखा आहेस तू, मी तुझ्या पाठीशी आहेच काही झाले तरी अशी खात्री पटवली. तिला खरे बरे वाटले जगात कोनलैतरि तिच्या आधाराची गरज होती तर, तिला वाटायचे कि हीच आपली आधार मागत फिरते सगळीकडे.
तिला राघव कडे बघून खरच वाईट वाटले, सोन्यासार्ळे मुलगा पण आज स्वताच्या आईवड्लांशी तोंड उघडून बोलू शकत नव्हता. तिने ठरवले कि उद्या आपल्यलाला मुले झाली कि आपण त्यांच्यावर काही म्हणजे काही निर्णय लादायचे नाही.
असा विचार आला तिच्या मनात आणि आता तिला वेध लागले सुहास च्या घरचे, बकुळीचा हार घातलेला सुहास चा फोटो आणि त्याची थकलेली म्हतारी आई तिला दिसायला लागले. आणि तिच्या डोक्यात एक युक्ती आली. तशी राघव ला ती म्हणाली चल, घर आणि घरची माणसे नाहीत म्हणतोस न तू, चल

माझ्याबरोबर आणि बघता बघता राघव ला घेऊन ती सुहास च्या घरी पोचली. सुहास ची आई आज तिला आणि तिच्याबरोबर अजून एक जणू सुहास सारखा अजून एक मुलगा पाहून, कोण ग हा असे विचारत उठली.

सुहासच्या आईला काय उत्तर द्यावे हे तिला पटकन कळेना. पण तिने खुणेनेच राघवला सांगितले. राघवने चटकन् सुहासच्या आईला नमस्कार केला आणि सांगितले, “ मी राघव, नयनाच्या भावासारखा आहे मी.”

सुहासच्या आईला हे कितपत ऐकू गेले ते तिला कळले नाही पण राघव नुसताच कसनुसा उभा बघून ती स्वयंपाकघरात गेली चहाचे आधण ठेवायला. सुहासची आई तरातरा आत आली आणि जोरात ओरडून म्हणाली,” मला चहा नकोय आणि ह्याला चहा द्यायची जरूर नाहीये.”

नयनाने स्वतःचं डोकं गच्च धरून ठेवलं दोन हातांनी. ती बाहेर आली आणि राघवला म्हणाली, “चल बाहेर.” राघव अवाक्. आता बाहेरच जायचं होतं तर इथे का घेऊन आलीस? पण काहीही न बोलता तो तिला हाताला धरून बाहेर घेऊन आला. मिट्ट काळोख होता बाहेर.

त्याने तिला अजितच्या घरी पोहचवले. अजित नुकताच ऑपरेशन संपवून घरी आला होता. मेधाच्या वाढदिवसाची सगळी तयारी बघून त्याला भरून आले होते आणि मनातल्या मनात तो नयनाला धन्यवाद देत होता. आता अवचितपणे इतक्या रात्री नयनाला घरी बघून तो जरा भांबावला.  राघवने अजितला सांगितले सगळे ... नयनाचा इतिहास, तिची घरची मंडळी आणि तिचं एकाकी पण अत्यंत कष्टिक जीवन.  अजितला वाटलं खरंच.. आत्ताच आपण एखादं गूढ आणि भयानक असं स्वप्न तर बघत नाहीय.....

नयनाची सोबत आयुष्यात मिळाली तर हे तिचं आणि आपलं असं एकाकी जीवन संपेल एकदाचं. पुन्हा जरा उत्साहाचे धुमारे फुटतील. मेधाला आई मिळेल आणि ह्या घराला हवं असलेलं घरपण!

त्याने क्षणभारच विचार केला आणि राघवला थांबायला सांगून तो आत गेला. थोड्या वेळाने बाहेर आला तो हातात एक सोन्याची साखळी घेऊन. नयनाला त्याने राघवसमोरच विचारले, “ नयना, आत्ता मी जे बोलणार आहे त्याचा मी पूर्ण विचार केला आहे. मला तुझ्याशी लग्न करण्याची इच्छा आहे.” “ काय?....” नयना जवळजवळ किंचाळलीच. “ पण.. मी ... मला ... तुम्ही.. तुला ... काय?” तिला काहीच सुचत नव्हते. राघवचे डोळे भरून आले. त्याने नयनाला डोळ्याने खुणावले आणि फक्त एवढंच म्हणाला, “ जगात देव आहे आणि तो पाठीराखा पण आहे. माझे काम झाले मी निघतो. ”

नयनाला खूप आनंद झाला होता पण कित्येक वर्षांत आनंद कसा दाखवायचा, अनुभवायचा हे ती विसरलीच होती.  त्यामुळे नक्की काय घडतंय ते तिला कळतच नव्हतं. अजितने तिच्या चेहेऱ्यावरूनच अंदाज बांधला आणि तिला जवळ घेतलं. “ मी तुला खूप सुखात ठेवीन, आपण रीतसर लग्न करून तुझ्या घरच्यांना मग कळवू या.”

नयना ह्या अवचित समोर आलेल्या सुखाने मोहरुन गेली. मनातल्या मनात सुहासला सांगितले तिने ... “ सुहास, मी सुखात आहे आणि सुखातच राहणार आहे. या जगात देव आहे. मला जी चेतना मिळतेय आत्ता ती देवाच्या अस्तित्वाचं प्रतीक आहे.”

नयनाने अजितचा हात हातात घेतला. ती त्याच्याबरोबर आत गेली आणि मनातून तो घुंगराचा पट्टा काढून फेकून दिला. आता सगळ्या दारांच्या चौकटी तिला सारख्याच दिसत होत्या मनामध्ये. फक्त ह्याच दाराची चौकट उन्हाने न्हाऊन निघाल्यासारखी दिसत होती - तेजस्वी !!